# <u>जाहीरात</u>

सावित्रीबाई फुले पुरस्कार सन २०१५-१६, २०१६-१७ व २०१७-१८ साठी व्यापक प्रसिध्दी व्हावी, या हेतूने शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे-०१ यांच्या www.dhepune.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेल्या शासन निर्णय दि.१५/१२/२०११ च्या अनुषंगाने इच्छुकांचे प्रस्ताव दि.२५/०५/२०१८ पर्यंत मागविण्यात येत आहे.

तरी इच्छुकांनी शासन निर्णय पाहून आपले परिपूर्ण प्रस्ताव खालील प्रपत्रात माहिती भरून त्यांच्या पृष्टयार्थ पुरावे म्हणून प्राप्त प्रशस्तिपत्रके, वर्तमान पत्रातील कात्रणे, पोलीस पडताळणी अहवालासह संचालक, उच्च शिक्षण, मध्यवर्ती इमारत, पहिला मजला, ससून हॉस्पिटल समोर, पुणे -४११ ००१ येथे व्यक्तिश: किंवा पोष्टाव्दारे ०३ प्रतीत दि. २५/०५/२०१८ पर्यंत सादर करण्यात यावेत, प्रपत्राचा नमूना खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | संपूर्ण नाव व पत्ता | दूरध्वनी क्रमांक | जन्म तारीख व वय | शिक्षण | शैक्षणिक व सामाजिक कार्याची माहिती | कार्याचा पृष्ठार्थ जोडलेले पुरावे. |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| | | | | | | |

१. उक्त पुरस्कारासाठी महिला स्वत: अर्ज करू शकतात किंवा नामनिर्देशन करू शकतात.

२. सामाजिक कार्य करणाऱ्या संस्थेत काम करणाऱ्या महिला या पुरस्कारासाठी पात्र ठरू शकतात, तरी अशा संस्थांनी नामनिर्देशन करण्यात येत असणाऱ्या महिलांची संपूर्ण माहिती कागदपत्रांसह सादर करावी.

दि.२५/०५/२०१८ या तारखेनंतर आलेल्या प्रस्तावांचा विचार करण्यात येणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी.

**टिप :** १. सावित्रीबाई फुले पुरस्कार ही योजना फक्त सामाजिक क्षेत्रात कार्य करणाऱ्या माहिलांसाठीच आहे.
२. सदर महिलेचे वय ५० वर्ष पूर्ण असावे.
३. प्रत्येक वर्षासाठी स्वतंत्र अर्ज करणे आवश्यक राहील.

स्वाक्षरी/-
(डॉ.धनराज माने)
शिक्षण संचालक, उच्च शिक्षण,
महाराष्ट्र राज्य, पुणे-०१.